# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Naresh M. Madavi
Director (I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/NSS/284 /2018 Dt:16/01/2018

प्रति,
मा. प्राचार्य/ कार्यक्रम समन्वयक
रा.से.यो. सलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:– . राज्यस्तरीय विशेष शिबीरामध्ये रासेयो स्वयंसेवक पाठविण्याबाबत.**

संदर्भ :– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की, **'आरोग्य संवर्धनाकरीता युवाशक्ती'** या नाविन्यपुर्ण संकल्पनेवर आधारीत शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयाच्या संयोजनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय शिबीर मौजा केशोरी /कनेरी ता. अर्जुनी/मोर जि. गोंदिया या ठिकानी दिनांक ०१ फेब्रुवारी २०१८ ते ०८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत आयोजीत करण्यात आलेले आहे. सदर राज्यस्तरीय शिबीरात सहभागी होण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील **०१** स्वयंसेवक **०१** स्वयंसेविका व **०१** कार्यक्रम अधिकारी यांचे नाव दिनांक २०/०१/२०१८ च्या आत राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कडे पाठविण्यात यावे हि विनंती.

धन्यवाद!

सलग्न :– १) शिबीराचा तपशिल, २) नियमावली, ३) नोंदनी अर्ज व प्रतिज्ञा पत्र, ४) वैद्यकीय प्रमाणपत्र,

**डॉ. नरेश मडावी**
**संचालक (प्र)**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यपीठ,गडचिरोली**

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.**
**शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय**
**(कला,वाणिज्य व विज्ञान)**
**अर्जुनी/मोरगाव, जि.गोंदिया**
**द्वारा आयोजित**

# राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय शिबिर

**क्रमांक : एस.एस.जे. /रा.से.यो.**
दि.

प्रति,
माननीय प्राचार्य,
__________________
__________________

**विषय :– 'आरोग्य संवर्धनाकरिता युवाशक्ती' या संकल्पनेवर आधारित राज्यस्तरीय रा.से.यो. शिबिर**

महोदय,

आजच्या जागतिकीकरण आणि विज्ञानाच्या काळात या देशाची खरी संस्कृती ही ग्रामीण भागातच पाहायला मिळते. म. गांधींचा 'खेड्याकडे चला' हा संदेश ध्यानी घेऊन देशाचे आधारस्तंभ असलेल्या नवयुवकांना ग्रामीण संस्कृतीची जवळून ओळख व्हावी आणि ग्रामस्वच्छतेच्या महान कार्याला त्यांचा हातभार लागावा यासाठी मा. राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेनुसार **'आरोग्य संवर्धनाकरिता युवाशक्ती'** या नाविन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित आमच्या शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयाच्या संयोजनाखाली **राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय शिबिर** मौजा केशोरी/ कनेरी ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया याठिकाणी दिनांक दि. १ फेब्रुवारी २०१८ ते ८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. त्याकरिता प्रस्तुत राज्यस्तरीय शिबिरात सहभागी होण्यासाठी आपल्या विद्यापीठाच्या रा.से.यो. पथकातील **०५** स्वयंसेवक **०५** स्वयंसेविका व ....... कार्यक्रम अधिकारी पाठविण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे उत्तम, सुजाण व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणारे नागरिक घडविण्याचे असल्यामुळे शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे शिस्तीचे पालन करणे अनिवार्य आहे. शिस्तभंग करणाऱ्या स्वयंसेवकांना शिबिरातून त्वरीत काढण्यात येईल व त्याबाबतची सूचना संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व रा.से.यो. समन्वयकांना देण्यात येईल.

आपणांस आवर्जून विनंती करण्यात येते की, यादृष्टीने आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांची काळजीपूर्वक निवड करावी व शिबिर यशस्वी होण्याकरिता सहकार्य करावे.

कृपया आपण या संदर्भातील अनुमतीदर्शक पत्र व शिबिरार्थ्यांची नावे दि. २५ जानेवारी २०१८ पर्यंत पोहचतील अशा बेताने प्राचार्य, शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/मोरगाव जि. गोंदिया यांचेकडे पाठवावीत, जेणेकरून शिबिरार्थ्यांची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सोयीचे होईल.

कळावे

**सहपत्र** : १) शिबीराचा तपशील , सूचना व नियम
२) Form of Indemnity

<u>आपले विनीत</u>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **डॉ. राजेश चांडक** | **प्रा. आशिष कावळे** | **डॉ. शरद मेश्राम** | **प्रा. बबन मेश्राम** | **डॉ. केशव वाळके** | **डॉ. संजीव पाटणकर** |
| शिबिर प्रमुख<br>कार्यक्रम अधिकारी | **डॉ. सतीश बोरकर**<br>शिबिर संयोजक<br>कार्यक्रम अधिकारी | शिबिर संयोजक<br>विभागीय समन्वयक | समन्वयक, रा.से.यो.<br>गोंदिया जिल्हा | संचालक<br>रा.से.यो. रा.तु.म.<br>नागपूर विद्यापीठ, नागपूर | प्राचार्य<br>एस.एस.जायस्वाल महा.<br>अर्जुनी/मोर. |

<u>प्रतिलिपी सादर :–</u>

१) मा. डॉ. अतुल साळुंखे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्यकारी अधिकारी
रा.से.यो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालयीन कक्ष, महाराष्ट्र शासन, एलिफिस्टन तंत्र विद्यालय परिसर – ३ महापालिका, मुंबई – ४००००१.
२) मा. कुलगुरू, रा.तु. म. नागपूर विद्यापीठ नागपूर.
३) मा. प्र. कुलगुरू, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४) मा. डॉ. केशव वाळके, संचालक, रा.से.यो. रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी/ मोरगाव जि. गोंदिया द्वारा आयोजित**

**राज्यस्तरीय रा.से.यो. शिबिर**

स्थळ : केशोरी/ कनेरी ता. अर्जुनी/मोर. जि.– गोंदिया.

( दि. १ फेब्रुवारी २०१८ ते ८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत )

**शिबिरार्थ्यांकरिता अत्यंत उपयुक्त सूचना, माहिती व नियम :**

रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्यावतीने आणि आमच्या शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयाच्या संयोजनत्वाखाली मौजा केशोरी/ कनेरी ता. अर्जुनी/मोर., जि. गोंदिया येथे **'आरोग्य संवर्धनाकरिता युवाशक्ती'** या संकल्पनेअंतर्गत राज्यस्तरीय रा.से.याजनेचे शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात विविध महाविद्यालयातील रा.से. योजनेचे सुमारे २५० स्वयंसेवक सहभागी होणार असून ग्रामीण भागामध्ये युवकांच्या सहभागातून ग्रामविकास साधला जाऊ शकतो ही संकल्पना सर्वसामान्य गावकऱ्यांपर्यंत पोहविण्याच्या दृष्टीने हे शिबिर निश्चितच मौलिक व प्रेरणादायी ठरेल असा विश्वास आहे.

शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक व सांस्कृतिकदृष्टीने युवकांसाठी अनेक मौलिक आणि धाडसी संकल्पना अत्यंत यशस्वीपणे राबविण्याचा आमच्या महाविद्यालयाचा उपक्रम स्थापनेपासून म्हणजे १९९० पासूनच सातत्याने सुरू असून या वर्षीचे शिबिर या उपक्रमांतील त्यापुढचे पाऊल आहे. आपल्या दमदार वाटचालीने अल्पावधीतच या महाविद्यालयाने अनेक क्षेत्रात महत्त्वपूर्ण यश प्राप्त केले आहे. 'प्रेरणा, प्रयोग आणि प्रगती' हे महाविद्यालयाचे विकाससूत्र असून उत्तम शैक्षणिक वातावरण, विस्तीर्ण विकसित क्रीडांगण, सुसज्ज व्यायामगृह, संमोहक परिसर व शिस्तबद्ध, अभ्यासू पर्यावरण ही या महाविद्यालयाची खास ध्यानाकर्षक वैशिष्ट्ये आहेत.

आमच्या महाविद्यालयाने यापूर्वी इटियाडोह जलाशयाशेजारी गोठणगाव जवळ तिबेटियन वसाहतीत १९९७–९८ व १९९९–२००० मध्ये दोनदा भारत तिब्बेत सांस्कृतिक स्नेहसंवर्धन शिबिराचे आयोजन केले होते व त्यात तिबेट, जपान, बांगलादेश येथील युवकांबरोबरच नागपूर, अमरावती, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ व आयुर्विज्ञान विद्यापीठ येथील सुमारे २५० स्वयंसेवकांचा सहभाग होता. या दोन्ही शिबिरांच्या आयोजनाला आंतरराष्ट्रीय स्वरूपाची प्रसिद्धी प्राप्त झाली. २०१०–२०११ मध्ये **गौरनगर (बंगाली पूनर्वसित गाव)** या स्थळी राज्यस्तरीय शिबिर, सत्र २०१२–२०१३ मध्ये राष्ट्रीय उद्यान असलेल्या **नवेगाव बांध** येथे राज्यस्तरीय शिबिर यशस्वीरित्या घेण्यात आले. सत्र २०१४–१५, २०१५–२०१६ आणि २०१६ – २०१७ मध्ये दत्तक गाव बोंडगाव देवी येथे अनुक्रमे महाविद्यालयीन, विद्यापीठ आणि राज्यस्तरीय शिबिरे घेण्यात आली. याचेच फलित म्हणजे आमच्या दत्तक गावाची रा.तु.म. नागपूर विद्यापीठाने गोंदिया जिल्ह्यातील विद्यापीठाचे दत्तक गाव म्हणून बोंडगाव देवी ची निवड केली ही आमच्यासाठी गौरवाची बाब आहे. यामुळेच विद्यापीठाच्या रा.से.योजना विभागाने यावर्षीही राज्यस्तरीय शिबिर आयोजित करण्याची सुवर्णसंधी महाविद्यालयाला प्रदान केली आहे.

**शिबिराची संकल्पना** :–

"गावावरून देशाची परीक्षा" हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्वप्न साकार करण्याकरिता व डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांनी २०२० साली भारत महासत्ता होण्याचे पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास जाण्यास कृषीप्रधान भारत देशात आर्थिक व्यवस्थेचा कणा असणारा शेतकरी हा ग्रामीण परिसरातच वसला आहे. त्यामुळे जोपर्यंत ग्रामीण भागातील खरा कष्टकरी व शेतकरी वर्ग स्वयंपूर्ण होत नाही, तोपर्यन्त भारत सुजलाम् सुफलाम् होणार नाही.

या देशाचा महासत्तेपर्यंतचा प्रवास तरूणांच्या कर्तृत्वावरच अवलंबून आहे. म्हणून ग्रामोन्नती अभियानामध्ये विद्यार्थी शक्तीच्या माध्यमाने खेड्याच्या विकासासाठी स्वयंपूर्ण भारताची संक्ल्पना पुढे आली. संपूर्ण जगाचे लक्ष या देशातील युवकांचे वाढते प्रमाण या बलस्थानावर आहे. या युवा शक्तीला रचनात्मक आणि विधायक कार्याकडे वळविण्याचा राष्ट्रीय सेवा योजनेचा सातत्याने प्रयत्न आहे.

**केशोरी: एक संक्षिप्त परिचय :—** हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले महादेवाचे प्रतापगड डोंगर, निसर्गरम्य इटियाडोह जलाशय व नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान यांच्या परिसरात असलेले अर्जुनी मोरगाव तालुक्यातील केशोरी हे गाव विविधतेने समृद्ध असे आहे. येथील लाल मिरची ही संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

आजच्या विज्ञानाच्या आणि जागतिकीकरणाच्या काळात शहरीकरणामुळे गावांची दुरावस्था होत आहे. मात्र झाडीपट्टी रंगभूमीचा सांस्कृतिक वारसा लाभलेल्या या गावाने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. केशोरी हे गाव विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असल्याचे दिसते. या गावाने विस्थापित असलेल्या टिबेटीयन आणि बंगाली लोकांचे पालकत्व स्वीकारले आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे व धर्मनिरपेक्षतेचे स्थळ मुस्लिम समाजाचे दैवत असलेले प्रतापगड केशोरीपासून जवळच आहे. गडचिरोली,चंद्रपूर या दोन्ही जिल्ह्यांना जोडणारा प्रमुख रस्ता केशोरीमधूनच जातो. अशा या विविधतेने नटलेल्या गावामध्ये 'स्वच्छ भारत सुंदर भारत' या अंतर्गत स्वच्छतेचा मंत्र देत शौचालयाचे बांधकाम पूर्ण करून देण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवून 'आरोग्य संवर्धनाकरिता युवाशक्ती' या संकल्पनेवर आधारित महाविद्यालयाने प्रस्तुत शिबिराचे आयोजन केलेले आहे.

१) **शिबिराचे स्थळ :** केशोरी / कनेरी ता. अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया

२) **शिबिराचा कालावधी** : दि. १ फेब्रुवारी २०१८ ते ८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत

३) **<u>शिबिरात उपस्थित राहण्याची वेळ आणि दिवस</u>** :— **सर्व शिबिरार्थ्यांनी बुधवार दि. ३१ जानेवारी २०१८ ला सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत शिबिरस्थळी उपस्थित राहावे. केशोरी हे गाव अर्जुनी मोरगावपासून २० किमी अंतरावर आहे. चंद्रपूर गोंदिया रेल्वे मार्गावरील अर्जुनी मोरगाव स्टेशनवरून केशोरी २० किमी अंतरावर आहे. नागपूर — साकोली — सानगडी — अर्जुनी/मोरगाव— महागाव— केशोरी किंवा नागपूर — साकोली — सानगडी — नवेगाव बांध — गोठणगाव — केशोरी या बसमार्गाने पोहचता येईल. पूर्वसूचनेवरून अर्जुनी मोरगाव रेल्वे स्टेशनवरून शिबिरस्थळी पोहचण्याची व्यवस्था करण्यात येईल. तरी सर्व शिबिरार्थ्यांनी वेळेवर येण्याची दक्षता घ्यावी. उशिरा येणाऱ्या शिबिरार्थ्यांना शिबीरस्थळी पोहचण्याची स्वत: व्यवस्था करावी लागेल.**

४) **<u>शिबिराची नियमावली :—</u>**

१) ओळखपत्र ( Identity card ), प्राचार्य व कार्यक्रम अधिकाऱ्यांचे अधिकृत पत्र.
२) शिबिरार्थी आपल्या पालकाच्या व महाविद्यालयाच्या संमतीने शिबिरात सहभागी होत आहे असे गृहीत धरून शिबिरात एखादा अपघात वा दुखापत झाल्यास व अन्य कारणांनी शिबिरार्थ्यांना व पालकांना नुकसान भरपाई मागता येणार नाही.
३) शिबिरात एकदा दाखल झाल्यावर शिबिर सोडून आपल्या मर्जीप्रमाणे गावाला व अन्य ठिकाणी जाता येणार नाही.
४) शिबिराच्या संपूर्ण कालावधीत शिस्त पाळावी व शांतता राखावी लागेल.
५) राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर सहजीवन शिबिर असून आपल्यापासून सोबत राहणाऱ्या कुणालाही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. परस्पराबद्दल अनुचित व असभ्य शब्दांचा वापर करू नये.
६) शिबिर प्रमुखांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांचे पालन करावे.
७) कोणत्याही व कशाच्याही संदर्भात अंतिम निर्णय हा शिबिर संयोजकाचा राहिल. तो मान्य करणे व त्यानुसार वागणे हे शिबिरार्थ्यांना अनिवार्य राहिल.
८) बेशिस्तपणा नजरेस आल्यास त्या विद्यार्थ्याला शिक्षा करण्यात येईल व त्याचे नाव संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येईल.
९) नेमून दिलेले काम व प्रकल्प जबाबदारीने पूर्ण करावे लागेल.
१०) प्रकल्पाचा अहवाल ठरवून दिलेल्या वेळातच द्यावा लागेल.
११) कोणालाही मद्यपान, धुम्रपान, गुटखा व मादक पदार्थाचे सेवन करता येणार नाही.
१२) शिबिर कालावधीत घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.
१३) सर्व शिबिरार्थ्यांची भोजन व निवासाची व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात येईल.
१४) महाविद्यालयांनी शिबिरार्थ्यांचा प्रवासखर्च नियमित रा.से.योजनेच्या अनुदानातून करावा.

५) **<u>शिबिराची दिनचर्या</u>** :—

| | | | |
|---|---|---|---|
| | पहाटे ५.०० वा. | — | जागर |
| | सकाळी ५.५५ ते ७.०० वा. | — | चिंतन/ व्यायाम |
| सत्र पहिले | सकाळी ८.०० ते १२.०० वा. | — | श्रमसंस्कार |
| सत्र दुसरे | दुपारी २.०० ते ४.०० वा. | — | बौद्धिक |
| | सायं. ४.०० ते ६.०० वा. | — | अहवाल वाचन, मनोगत. |
| | रात्रौ. ८.०० ते १०.०० वा | — | सांस्कृतिक कार्यक्रम |

६) **<u>शिबिरातील विशेष प्रकल्प</u>** :—

१) स्वच्छतेचे महत्त्व
२) श्रमसंस्कार
३) वन व्यवस्थापन
४) पर्यावरण विषयक जागरूकता
५) साक्षरता.
६) जल व्यवस्थापन
७) शिक्षण व स्वयंरोजगार
८) वृक्षसंवर्धन
९) महिला सबलीकरण
१०) ग्रामसंस्कृती संवर्धन
११) स्वच्छता व आरोग्याविषयी जागरूकता

७) **<u>सांस्कृतिक कार्यक्रम</u>** :— शिबिरात सादर करण्यात येणारे सांस्कृतिक कार्यक्रम रा.से.योजनेच्या उपक्रमांना साजेसे असावे. लोकप्रबोधन व जनजागृती ही उद्दिष्टे असलेल्या कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात येईल. सांस्कृतिक कार्यक्रमाला लागणारे साहित्य स्वयसेवकांनी आपल्या सोबत आणावे.

८) **<u>शिबिरार्थ्यांनी सोबत आणावयाचे साहित्य</u>** :—

A) थंडीचे दिवस असल्यामुळे पुरेसा बिछाना
B) रा.से.यो.चे बॅच, डायरी, वही, पेन, टॉर्च,
C) साबून, कंगवा, तेल, ताट, वाटी, पेला, चम्मच इ. साहित्य शिबिराकडून पुरविण्यात येईल.
D) कोणत्याही मौल्यवान वस्तू जसे मोबाईल, दागीणे, कॅमेरा इ. आणल्यास त्याची जबाबदारी स्वतः विद्यार्थ्याची राहील
E) औषधाची गरज असल्यास औषध सोबत आणावे.
F) शिबिरार्थ्यांनी महाविद्यालयाचा ध्वज किंवा बॅनर सोबत आणावा.

**संपर्क** :— शिबिरासंदर्भातील अधिक माहितीसाठी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा.

**डॉ. राजेश चांडक ९४२३६८९३४३** **प्रा. आशिष कावळे ९४०३४३९२१६**
**डॉ. शरद जे. मेश्राम ९४०४२७९७९९** **डॉ. सतीश बोरकर ८०५५६०५१६३**

आपण त्वरीत अनुमती दर्शकपत्र व विद्यार्थ्यांची नावे पाठवावीत. ही विनंती.

धन्यवाद !

**डॉ. राजेश चांडक**
शिबिर प्रमुख,
कार्यक्रम अधिकारी

**डॉ. शरद जे. मेश्राम**
शिबिर संयोजक
कार्यक्रम अधिकारी

**प्रा. आशिष कावळे**
**डॉ. सतीश बोरकर**
शिबिर संयोजक
कार्यक्रम अधिकारी

**डॉ. संजीव पाटणकर**
प्राचार्य

RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY, NAGPUR

**SHIVPRASAD SADANAND JAISWAL COLLEGE**

(ARTS , COMMERCE & SCIENCE)

ARJUNI MORGAON DIST. GONDIA

## STATE LEVEL N.S.S. CAMP, KESHORI/ KANERI

REGISTRATION FORM & IDEMNITY FORM

---

## NATIONAL SERVICE SCHEME

1) Name of the Student :-

2 ) Name of the College :-

3 ) Class :-

4 ) Blood Group :-

5 ) Date of Birth :-

6 ) Cast :-

7 ) Home address of the Student :-

8 ) Contact No :-

9 ) Experience in NSS ( Year ) :-

10 ) Language Known :-

11 ) Camp attend ( Village Name )

12 ) Hobby :-

13 ) Special Skill Art :-

14 ) Any Other activities :-

15 ) Interesting Field :-

16 ) Remark ( Height/ Weight ) :- Height---------------Weight-------------------------

Signature of N.S.S. Volunteer

Signature of Programme Officer N.S.S. & Seal

## IDEMNITY FORM

In Consideration of my nomination at my request to undergo all types of training and also participating in my camp course / adventure training activities in my /our side NSS and travelling. I undertake and agree that neither I nor my executer administrative will make and claim against the Government of India and against my Officer of NSS/Principle /Programme Officer/Programme Co- ordinators / State Liaison Officer / Youth Officer / Assistant Programme advisor / Deputy Programme advisor in respect of any loss or injury to the property of person ( including injury resulting in death ) which may be while or in consequence of my being act in out side N.S.S and travelling. I understand that no compensation will be paid by the government of India or any Officer as mentioned against any such loss or injury ( including injury resuming in death ) and I agree so as to bind my self , executer and administration to indemnity to the service of Government of India against any claim which may be made by any third party against them or any of accident arising out of any act of default on my part during or in connection / of said Training Camp / course /NSS/ RD parade / adventure training camp/ College Camp / University Camp / **State Level Camp** and journey by road / Rail / River and Flight .
State Level Camp, Keshori, Ta.- Arjuni Mor. Dist.- Gondia

Applicants Signature

Home address

In the Presence of Witness No.
1.
2.

Dated – / / 2018

Signature of Parents

RASHTRASANT TUKDOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY, NAGPUR

**SHIVPRASAD SADANAND JAISWAL COLLEGE**

(ARTS , COMMERCE & SCIENCE)

ARJUNI / MORGAON DIST. GONDIA

## STATE LEVEL N.S.S. CAMP, KESHORI/ KANERI

### CERTIFICATE OF MEDICAL/PHYSICAL FITNESS

Name of the candidate:...................................................................

I do hereby certify that I have examined the volunteer and found him/her fit for undergoing NSS STATE LEVEL CAMP at Keshori Dist. Gondia. whose signature given above is not suffering from any communicable or chronic disease, which may cause any hindrance due to his/her participation in the CAMP.

Seal

Address with Contact No Signature of the Medical Officer

Date--------------